पूर्वा
कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

मुखपृष्ठ
विजय सैंदाणे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय

## ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना अर्थसंकल्पातून चालना



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषिक्षेत्राचे भरीव योगदान
- तेलबिया आणि कडधान्ये उत्पादनात मात्र स्वावलंबन गरजेचे
- पशुसंवर्धन तसेच मत्स्यपालन व्यवसायाचा वृद्धिदर समाधानकारक
- 'मिलेट- मिशन'चा श्रीगणेशा तर झाला; वाटचाल वेगाने व्हावी
- निसर्गाधारित शेतीमध्ये शेतकऱ्यांचा प्रतिसादही जाणून घ्यावा
- कृषिक्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रातून युवा पिढी आत्मनिर्भर व्हावी

देशाच्या अमृत महोत्सवी पर्वातील पहिला, म्हणजेच सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केला. खरं तर कोरोनामुळे मागील दोन वर्षे साऱ्या जगालाच आर्थिकदृष्ट्या कमकुवत करणारी ठरली असली, तरी भारताने मात्र आर्थिक विकासाचा वेग ७ टक्क्यांपर्यंत ठेवून जगात अव्वल क्रमांक मिळविला आहे. या काळात भारतात आर्थिक विकासाचा दर वाढण्यामध्ये शेती क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे, हे मात्र नाकारता येणार नाही. याचीच जाणीव ठेवून, या वर्षीच्या बजेटमध्ये ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधा मजबूत करून कृषी विकासाला चालना मिळावी यासाठी काही योजना जाहीर केल्या आहेत. तसेच मागील काही योजना पुढे सुरू ठेवल्या आहेत. अर्थात यातून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातात मात्र जास्त काही मिळण्याची शक्यता दिसत नाही, हेही नमूद केले पाहिजे.

देशातील एकूण सकल उत्पादनात कृषिक्षेत्राचा वाटा १९ टक्के असला तरीही, या क्षेत्राच्या विकासाचा दर ३.६ टक्क्यांपर्यंत राहिल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्राने भक्कम साथ दिली आहे आणि 'कृषिप्रधान' हे बिरूद सार्थ केले आहे. १३५ कोटी लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी ३.१५ कोटी टन अन्नधान्याची निर्मिती केल्यामुळेच, मागील दोन वर्षांपासून

८० कोटी जनतेला मोफत व अल्पदरात अन्नधान्य पुरवठा करण्यामध्ये सरकारला यश आले.

## कृषिक्षेत्राला २० लाख कोटींचे वित्तसाह्य निर्धारित

तेलबिया, कडधान्ये यांचे परावलंबित्व कमी करण्यासाठी या पिकांच्या आधारभूत किंमती वाढविण्यात आल्या असल्या, तरी त्यात भरीव वाढ केली नाही त्यामुळे यांमध्ये स्वावलंबन येऊ शकले नाही. मागील काही वर्षांमध्ये पशुसंवर्धन आणि मत्स्य व्यवसायात चांगली वृद्धी झाली आहे. कृषिक्षेत्राच्या एकूण उत्पादनामध्ये पशुसंवर्धनाचा वाटा ३० टक्के तर मत्स्य व्यवसायाचा वाटा ७ टक्के आहे. या दोन्हीही क्षेत्रांच्या वाढीला फार मोठा वाव आहे; ज्यातून शेतकरी तसेच ग्रामीण भागाचे अर्थकारण सुधारेल. याचाच विचार करून या विभागांच्या वृद्धीसाठी अनेक पावले उचलली आहेत. मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी ६००० कोटी रुपयांची विशेष तरतूद केली असून, यातून उत्पादन वाढ आणि विक्री व्यवस्था यांमध्ये सुधारणा होईल. तसेच पीक कर्जाप्रमाणेच या दोन्हीही व्यवसायांना कर्ज देताना देण्यात येणाऱ्या सर्व सवलती मिळणार आहेत. कृषिक्षेत्राला २० लाख कोटी रुपयांचा कर्जपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. अर्थात अजूनही अनेक अल्पभूधारक शेतकरी संस्थात्मक कर्जापासून दूर आहेत. १२ कोटी शेतकऱ्यांपैकी ८६ टक्के शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. या सर्व शेतकऱ्यांना प्रत्यक्षात कोणत्या बँकेकडून आणि किती प्रमाणात कर्ज मिळाले याची आकडेवारी प्रत्येक बँकेकडून वेळोवेळी जाहीर झाली, तर यामध्ये पारदर्शकता येईल. २०२२ हे वर्ष 'जागतिक भरड धान्ये वर्ष' साजरे करण्यात आले. खरं तर भारत हा जगातील भरड धान्ये उत्पादनामध्ये प्रथम तर निर्यातीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. भरड धान्यांचा देशांतर्गत वापर वाढला तसेच निर्यात वाढली तर त्यांचे उत्पादन वाढविण्यास मोठा वाव आहे कारण भरड धान्ये कमी पाण्यामध्ये, जिरायत शेतीमध्ये तसेच कमीत कमी उत्पादन खर्चात येतात. हे पीक सर्वसाधारण शेतकऱ्यांचे आहे. भरड धान्ये हे भविष्यकाळातील आरोग्यसंपदा जपणारे अन्न आहे. याचाच विचार करून या वर्षीच्या बजेटमध्ये 'श्री अन्न अभियान' म्हणजेच 'मिलेट- मिशन'ला पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केला आहे.

जागतिक स्तरावर 'मिलेट हब' तयार करण्यासाठी प्रयत्न झाले तर कृषी क्षेत्राबरोबरच ग्रामीण भागाचा कायापालट होऊ शकतो. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी सततच प्रश्न असतो तो म्हणजे आयात होणारा कापूस, विशेषत: लांब धाग्याचा कापूस! आयात कापसामुळे बाजारभाव पडतात. लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन वाढविणे, यासाठी विशेष कापसाचे क्लस्टर तयार करणे, प्रक्रिया आणि विक्री व्यवस्था सक्षम करणे तसेच सरकारी- खासगी गुंतवणूक वाढविण्यासाठी प्रयत्न होणार असल्याचे बजेटमध्ये नमूद केले आहे. यातून कापूस उत्पादकांना एक मोठी संधी उपलब्ध होऊ शकते.

## नैसर्गिक शेती : कृषी यंत्रणांचे पाठबळ कितपत?

मागील वर्षीच्या अर्थसंकल्पाप्रमाणेच या बजेटमध्ये 'झिरो बजेट- नैसर्गिक शेती'ला चालना देण्यात येणार असल्याचा उल्लेख अर्थमंत्री यांनी करून; यावर्षी एक कोटी शेतकऱ्यांना या संकल्पनेमध्ये सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे नमूद केले. खरं तर रासायनिक निविष्ठांचा शेतीमध्ये वापर कमी करणे हा चांगला उद्देश असला तरीही नैसर्गिक शेतीला कृषी संशोधन, कृषी विस्तार यंत्रणांचे किती पाठबळ आहे, हा संशोधनाचाच विषय आहे! तसेच ज्यांच्यासाठी ही योजना आहे ते शेतकरी खरंच या सर्व संकल्पनेला किती प्रतिसाद देतात हा महत्त्वाचा मुद्दा आहे! याचे कारण शेतकरी त्याच पिकाचे आणि त्याच पद्धतीने उत्पादन घेतो, ज्यातून त्याला जास्त फायदा होतो. ही संकल्पना खरंच विकसित करायची असेल तर शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य करावे लागेल. तसेच संशोधक आणि विस्तारकांचे पाठबळ द्यावे लागेल. कृषी क्षेत्रात तसेच शहरी भागात वाया जाणारे सर्व सेंद्रिय पदार्थ प्रक्रिया करून त्यांचा शेतीमध्ये योग्य पद्धतीने पुरवठा झाला तर यातून काहीतरी साध्य होईल. या अर्थसंकल्पामध्ये अशा प्रकारचे नेटवर्क तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. देशातील जी आकडेवारी जाहीर केली जाते ती सिक्किम, उत्तराखंड, त्रिपुरा यासारख्या राज्यांची आहे, जेथे आजही शेतीमध्ये बाह्य निविष्ठांचा वापर अल्प आहे.

## सहकाराच्या पाठबळातून समृद्धीच्या महामार्गाकडे...

देशातील ४४ लाख शेतकरी सेंद्रिय शेतीचा वापर करतात, ज्यात आठ राज्ये आघाडीवर आहेत. यात मात्र महाराष्ट्राबरोबरच पंजाब, हरियाणा यांसारख्या शेतीमध्ये प्रगत असलेल्या राज्यांचा नामोल्लेख नाही ही विचार करण्याची बाब आहे. याचबरोबर अशा संकल्पनेतून देशाचे अन्नधान्ये उत्पादन आणि अन्नसुरक्षा अबाधित राहील का याचाही विचार करावा लागणार आहे. ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना सुरू आहे, जी जास्तीत जास्त सक्षम करण्याचा प्रयत्न होणार आहे.

कोरोना काळामध्ये सूक्ष्म तसेच मध्यम उद्योजकांना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागले. तरीही मागील वर्षात या उद्योजकांनी गरुडभरारी घेत देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठे पाठबळ दिले आहे. हे उद्योजक ग्रामीण तसेच निमशहरी भागांमध्ये त्यांचे व्यवसाय करत असल्यामुळे त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. कृषी आणि कृषिपूरक व्यवसाय, कृषिमाल प्रक्रिया उद्योग, शेतीचे यांत्रिकीकरण, काटेकोर शेती पद्धती, ग्रामीण तसेच कृषी पर्यटन, शेतीमध्ये ड्रोनचा वापर, माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून पीक उत्पादन वृद्धी, विक्री व्यवस्था, पीक विमा, पीक उत्पादनाचे अंदाज काढणे तसेच पीक लागवडीचे नियोजन करणे यासारख्या अनेक नाविन्यपूर्ण संकल्पना शेतीक्षेत्रात येत आहेत. तरुणांना यातून रोजगाराची मोठी संधी आहे. यासाठी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना तसेच आर्थिक सहाय्य- पाठिंबा योजना उपयुक्त ठरू शकतात. भविष्यात यामध्ये ग्रामीण युवकांना फार मोठी संधी उपलब्ध होऊ शकते. 'सहकारातून समृद्धीकडे' हा मूलमंत्र देणाऱ्या महाराष्ट्रामध्ये याचा विचार खरं तर प्राधान्याने करण्याची गरज आहे. या अर्थव्यवस्थेमध्ये सहकाराला पाठबळ देण्यासाठी अनेक योजना तयार केल्या असून यामध्ये मोठ्या प्रमाणात अनुकूल बदल अपेक्षित आहे. देशातील ८.५ लाख नोंदणीकृत सहकारी संस्थांचे २९ कोटी सभासद आहेत. शेतीसाठी १९ टक्के कर्जपुरवठा सहकारी संस्थांच्या माध्यमातून होतो. २००२ मधील सहकार कायद्यामध्ये बदल झाल्याने तद्नंतरच्या २०२२ च्या नव्या कायद्यानुसार सहकारी संस्था ठरावीक कार्यक्षेत्रात काम करण्याऐवजी अनेक प्रांतांमध्ये काम करू शकते. देशातील १५२८ मल्टिस्टेट सहकारी संस्थांपैकी ६६१ संस्था महाराष्ट्रामध्ये आहेत आणि त्यांच्याकडे २.६० लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. हाच मुद्दा लक्षात घेऊन या सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी ग्रामीण भागामध्ये विकासाला चालना देणे गरजेचे आहे. या सहकारी संस्थांमधील माहिती तंत्रज्ञान सुविधांच्या सबलीकरणासाठी अर्थसंकल्पामध्ये प्रावधान केले आहे. याचा नक्कीच फायदा होईल. यातून अल्पभूधारक शेतकरी तसेच ग्रामीण कारागीर यांना लाभ होऊ शकतो.

## नव्या विकासाभिमुख कल्पना दिशादर्शक ठराव्यात

खरं तर शेती हा राज्याचा विषय असला तरीही केंद्रीय अर्थसंकल्पामुळे कृषी विकासवृद्धीच्या अनेक योजनांना पाठबळ मिळते. देश अमृतमहोत्सवी पर्व साजरे करीत असताना; कोरोना महामारीनंतरच्या काळातील या अर्थसंकल्पामध्ये लोकसहभागातून ग्रामीण तसेच कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबरच अनेक संकल्पना मांडलेल्या आहेत. तसे बघता, शेतीला फार आधार देणारा हा अर्थसंकल्प नसला तरी नवीन दिशा देणारा नक्कीच ठरेल असे वाटते.

-विशेषत: या अर्थसंकल्पामध्ये अनुदानापेक्षा मूलभूत आणि पायाभूत सेवासुविधा तसेच बौद्धिक क्षमता वाढविण्यावर जास्त भर दिलेला आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये १० लाख कोटी रुपये भांडवली खर्च सरकार करणार असल्यामुळे नक्कीच खासगी संस्थाही यासाठी पुढे येतील. या पायाभूत सुविधांमधूनच देशाच्या ग्रामीण भागाचा, पर्यायाने शेतकऱ्यांचा शाश्वत विकास होईल अशी अपेक्षा आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय भास्कर पवार यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : डॉ. भास्कर गायकवाड

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.